असा. क्र. २० रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे ४, २००६ / वैशाख १४, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम | १५८-१६० |

दिनांक ४ मे २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ मे २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९७७ चा महा. १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याच्या कलम ४अ मध्ये,— १९७७ चा महा. १.

(क) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " १ ऑगस्ट १९९३ " या मजकुराऐवजी, " १ जानेवारी २००६" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " विधवा " या मजकुराऐवजी, " विधवा किंवा विधुर " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " एक हजार रुपये " या मजकुराऐवजी, " तीन हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२अ) मध्ये,—

(एक) " १ ऑगस्ट १९९३ " या मजकुराऐवजी, " १ जानेवारी २००६" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " विधवेस " या मजकुराऐवजी, " विधवेस किंवा विधुरास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " एक हजार रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " तीन हजार रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२अ) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

" (२ब) पोट-कलम (१), (२) किंवा (२अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, जो राज्य विधानमंडळाचा सदस्य या अधिनियमाअन्वये निवृत्तिवेतन मिळण्यास हक्कदार नव्हता अशा सदस्याच्या विधवेस किंवा विधुरास १ सप्टेंबर २००० पासून ३१ डिसेंबर २००५ पर्यंत, दरमहा, एक हजार रुपये, आणि दिनांक १ जानेवारी २००६ पासून दरमहा तीन हजार रुपये, याप्रमाणे निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(२क) दिनांक १ जानेवारी २००६ पासून, मृत सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्यूच्या पश्चात त्या सदस्याचे अज्ञान अपत्य किंवा अपत्ये हयात असतील तर, अशा अज्ञान अपत्याला किंवा अपत्यांना, विधवा किंवा विधुर यांना ज्याप्रमाणे निवृत्तिवेतन देय होते त्याचप्रमाणे दरमहा निवृत्तिवेतन देण्यात येईल आणि असे निवृत्तिवेतन, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने देण्यात येईल. " ;

१५८५

(घ) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (३) जेव्हा अशा विधवेने किंवा विधुराने पुनर्विवाह केला असेल त्या बाबतीत, ती किंवा तो, तिने किंवा त्याने पुनर्विवाह केल्याच्या दिनांकापासून, या कलमान्वये निवृत्तिवेतन मिळण्यास हक्कदार असणार नाही. " ;

(ङ) समासटीपेमध्ये, " सदस्याच्या विधवेला " या मजकुराऐवजी, " सदस्याच्या विधवेला, विधुराला किंवा अज्ञान अपत्याला " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई